# ७३ वी घटना दुरुस्तीव ग्रामसभेची ग्रामविकासातील भूमिका

**दौलत भुजंगा साळवे,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हपूर

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात लोकशाही ही अधिक लोकाभिमुख शासनव्यवस्था असल्याचे मानले जात असले तरी वर्तमान संसदीय लोकशाहीत मोठ्या प्रमाणावर दोष निर्माण झाले आहेत लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून जे प्रचलित शासन चालविले जाते त्या शासनाकडून लोकशाहीला अपेक्षित असलेल्या लोकांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. वंश, जात, वर्ग, पैसा इत्यादींच्या प्रभावातून प्रतिनिधींची निवड होते, असे सामान्य निरीक्षण आहे, त्यामुळे प्रतिनिधी आपल्या मतदारांच्याप्रति असलेले उत्तरदायित्व विस्तारत चालले आहेअशा प्रसंगी नागरिकांचा शासन व्यवस्थेतील . .प्रत्यक्ष सहभाग आवश्यक झाला असून तो सहभाग नोंदविण्याची संधी ग्रामसभेच्या माध्यमातून नागरिकांना मिळते वर्तमान लोकशाही व्यवस्था नागरिकांच्या सहभागातून अधिक बळकट करण्यासाठी ग्रामसभेला अनन्यसाधारण महत्व आहे. ग्रामसभा मात्र ग्रामपातळीवर गावाच्या क्षेत्रात काम करणारी नागरिकांची चिरंतन सभा आहेगावातील .' प्रौढ नागरिक हा या सभेचा नैसर्गिक सभासद असतो .अशा ग्रामसभाला अधिक बळकट करण्यासाठी ७३ वी घटनादुरुस्ती केली. यामुळे ग्रामसभेला घटनात्मक अधिकार प्राप्त झाले.

**७३ वी घटना दुरुस्ती : ग्रामसभा**

ग्रामविकास राष्ट्रविकासाचा मूलभूत पाया मानला जातो. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४० मध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख आढळतो. परंतु हे कलम राज्याच्या मार्गदर्शक तत्वामध्ये येत असल्यामुळे याकडे राज्यांनी दुर्लक्ष केले. भारतामध्ये प्राचीन कालखंडापासूनपंचायतराज संस्था अस्तित्वात आहेत. परंतु या संस्थांना घटनात्मक दर्जा नसल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणामध्ये या संस्थांचा विकास झाला नाही. पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात यावा. अशी शिफारस सर्वप्रथम १९८६ मध्ये डॉ. एल. एम. सिंघवी या समितीने केली होती. ग्रामीण भागात सत्तेचे विकेंद्रीकरण होण्यासाठी व पंचायतराज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा देण्यासाठी पहिला प्रयत्न राजीव गांधी यांनी केला त्यांनी'नया पंचायतराज' नावाचे ६४ वे घटनादुरुस्ती विधेयक १९८९ ला संसदेतसादर केले. परंतु विधायक मंजूर झाले नाही. तसेच व्ही. पी. सिंग व चंद्रशेखर यांनीही प्रयत्न केले. त्यानंतर ते विधेयक पी.व्ही.नरसिंहराव सरकारने सप्टेंबर १९९१ मध्ये लोकसभेत तिसऱ्यांदा मांडले. त्याला२२ डिसेंबर १९९२ रोजी मंजूरी मिळाली व दुसऱ्याच दिवशी म्हणजे २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने ते मंजूर केले.

अशा तऱ्हेने केंद्र सरकारने पंचायत राज्य पद्धतीला बळकट करणारी७३ वी घटना दुरुस्ती केली. राष्ट्रपतींनी त्या दुरुस्तीला २० एप्रिल १९९३ रोजी मान्यता दिली आणि भारतात तिची अंमलबजावणी २४ एप्रिल १९९३ पासून सुरु झाली. या पद्धतीने पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक स्थान प्राप्त झाले.७३ व्या घटना दुरुस्तीत सुचविल्याप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा महाराष्ट्र व पंचायत समिती दुरुस्ती विधेयक १९९४ या नावाचा कायदा केला. या कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थेत विविध बदल झाले . या ७३ व्या घटना दुरुस्ती कायदयाने "पंचायती" या शीर्षकाखाली "भाग ९-अ" हा नवा भाग राज्य घटनेमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामध्ये कलम २४३ ते कलम २४३-ओ अशी कलमे समाविष्ट केलेली आहेत. याशिवाय या कायदयाने राज्य घटनेला ११ वे परिशिष्ट जोडले असून त्यामध्ये पंचायत राज संस्थाच्या अधिकार कक्षेत येणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज्यांची स्थापना करण्याचे बंधन प्रत्येक राज्यावर घातले आहे. त्यामुळे पंचायत राज्याची स्थापना ही आता राज्याची "घटनात्मक जबाबदारी" ठरली आहे. राज्य घटनेच्या २४३-बी या कलमान्वये राज्यामध्ये ग्राम, मध्य व जिल्हा स्तरावर पंचायतीची स्थापना करता येईल अशी तरतूद आहे. या पंचायत व्यवस्थेमध्ये ग्रामसभेला महत्वपूर्ण स्थान असून ७३ व्या घटना दुरुस्तीने भारतीय राज्यघनेतील २४३ (डी) मध्ये ग्रामसभेस घटनात्मक दर्जा दिला आहे तसेच ग्रामसभा घेणे बंधनकारककेले आहे.

७३ व्या घटना दुरुस्तीची व वैशिष्टे :

१.पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला.

२.जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत याप्रमाणे त्रिस्तरीय पध्दत निर्माण झाली.

३. ग्रामसभा घेणे बंधनकारक झाली व त्याला ग्रामसभेस घटनात्मक दर्जा दिला.
४.महिला सदस्यांसाठी एक तृतियांश(३३.३३%) जागांचे आरक्षण, लागू झाले.महाराष्ट्रात ७३ वी घटना दुरुस्ती लागू होणेपूर्वी महिलांसाठी ३०% आरक्षणाची तरतूद होती. नवीन धोरणानुसार ५०% तरतूद लागू झाली.
५.अनुसूचित जाती-जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यात आले.
६.राज्य निवडणुक आयोगाची व राज्य वित्त आयोगाची तरतूद केली.
८.पंचायतींची मुदत पाच वर्षे केली गेली व निवडणूकीला उभे राहण्याकरीता वयाची अट, वय वर्षे २१ पूर्ण असणे अनिवार्य केले व दर पाच वर्षांनी निवडणूका घेणे बंधनकारक केले. एखादी पंचायत बरखास्त केल्यास सहा महिन्यात निवडणूका घेणे आवश्यक केले. तसेच आरक्षण सरपंच, सभापती, पंचायत समिती व अध्यक्ष, जिल्हा परिषद या पदांनाही लागू करण्यात आले.

या प्रकारे घटना दुरुस्ती होऊन पंचायत राज मधील ग्रामसभाच्या अधिकारात वाढ झाली आणि ग्रामसभा घेणे बंधनकारक झाली व त्याला ग्रामसभेस घटनात्मक दर्जा देण्यात आलेला आहे. तसेच घटना दुरुस्तीतील कलम २४३ (डी) अन्वये गावकारभारात लोकांचा सहभाग वाढावा या हेतूने ग्रामसभेचे आयोजन करणे हे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्यावर बंधनकारक केलेले आहे. गावाच्या विकासाची दिशा व विचार केंद्र सरकारातील तसेच राज्य सरकारातील राज्यकर्त्यांपेक्षा गावातील स्थानिक गावकरी, स्त्री, पुरुष अधिक चांगल्या पद्धतीने करू शकतात यावर या कायदयाने शिक्कामोर्तब केले गेले.

**ग्रामसभेची गावाच्या विकासातील भूमिका :-**

पंचायत राजव्यवस्थेमध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद ही ग्रामीण विकासाची त्रिसुत्री आहे. गाव पातळीवर ग्रामविकासात ग्रामपंचायतीची भूमिका ही अत्यंत महत्वपुर्ण असते. ग्रामसभा ही प्रत्यक्ष लोकशाहीचे प्रतिबिंब असून आज ग्रामपंचायतीच्या व्यवस्थेत ग्रामसभेला अनन्य साधारण महत्व आहे. ग्रामसभा या लोकशाही सक्षमीकरणाच्या दृष्टीने कार्य करीत असून ७६ व्या घटनादुरुस्ती नुसार ग्रामसभेला घटनात्मकदृष्ट्या अधिकार बहाल करण्यात आलेले आहेत. अशा या ग्रामसभा गावातील लोकांच्या प्रतिबिंबाचे प्रतिनिधीत्वकरतात.

**१. लोकशाहीच्या सक्षमीकरणाचे कार्ये :-**

ग्रामसभा ही लोकांना शासन कारभारात सहभागाची संधी देते. यामुळे गावाच्या विकासातील निर्णय प्रक्रियेमध्ये गावातील सर्व लोकांचा सहभाग होतो. यातून लोकशाहीच्या विषयी लोकांच्या मनात आस्था निर्माण होते. लोकशाहीमध्ये मतदार हा राजा असतो व तो ख-या अर्थाने ग्रामसभेच्या माध्यमातून आपल्या अधिकाराचा वापर करतो. ग्रामसभेतून राज्यघटनेविषयी व लोकशाहीच्या प्रक्रियेविषयी लोकांच्या मनात आस्था निर्माण होते व ही आस्थाच लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी महत्वाची असते.

**२. गावाच्या विकासामध्ये प्रत्यक्ष सहभाग :-**

विकेंद्रीकरणाची लोकशाही प्रक्रिया प्रत्यक्षात ग्रामसभेच्या मार्फत होते. लोकशाही व्यवस्थेतील राजकीय प्रक्रियेतील निर्णय क्षमतेमध्ये व विकासात प्रत्यक्ष मतदारांना सहभाग घेता येत नाही. पण ग्रामसभा हे एकमेव असे व्यासपीठ आहे की जेथे मतदारांना प्रत्यक्ष सहभाग घेऊन गावाच्या विकासाचा नियोजीत आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभाग घेता येतो. तसेच आपल्या अधिकाराचा वापर करुन विकासाला बाधक असणा-या गोष्टीबाबत असंमती दाखवता येते.

**३. लोकाभिमुख व्यवस्था निर्माण करते :-**

ग्रामसभेत गावातील सर्व मतदार हे सदस्य असून त्यांना सदस्य या नात्याने अधिकार बहाल केलेले असतात. दलित, आदिवासी, महिला व तरुणांच्या आशा, आकांक्षा, व्यथा, वेदनांना वाव देणारे, गावाचे शहाणपण, सदिच्छा व कर्तृत्व व्यक्त ग्रामसभात केले जाते. आवाजहीन लोक, दुर्बल घटक, आणि महिलावर्ग यांचा प्रामुख्याने तळागाळातील समुदायामध्ये यात समावेश केला जातो. सामाजिक, आर्थिक अशी लोकाभिमुख व्यवस्था ग्रामसभेतून प्रकट होते.

**४.शासकीय योजनांचा लाभ पोहविण्याचे कार्य :-**

ग्रामसभेला शासनाद्वारे राबविल्या जाणा-या विविध योजनांच्या लाभार्थींची निवड करण्याचा अधिकार दिला आहे. तसेच विविध योजनांची कार्यप्रणालीचे निरिक्षण करण्याचा अधिकार असल्यामुळे ग्रामसभा हीशासकीय योजनांचा लाभ तळागळातील वंचित घटकांना पोहचविण्याचे कार्य करते.

**५. ग्रामसभेचा एल्गार म्हणून ग्रामसभेचे कार्य :-**

ग्रामसभा ही ग्रामीण विकासात फक्त शासकीय कागदपत्र पाहणे, मंजुरी देणेठराव करणे याबाबतच नसून गावातील स्थानिक समस्या व त्यांच्याविषयीचे प्रश्न उपस्थित करुन त्याच्याबाबत साधक बाधक चर्चा करणारे व्यासपीठ आहे.

**६. अनु. जातीजमाती व महिला नेतृत्वांना प्रोत्साहन:-**

ग्रामसभेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील अनु. जाती जमांतींना विकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभाग करुन घेतला जातो. व तसेच त्यांना योग्य नेत्त्वाची संधी दिली जाते.समाजातील अस्पृश्य जाती यासुध्दा ग्रामविकासाचा घटक आहे. अशी भावना निर्माण होते. ग्रामसभेतून महिला सक्षमीकरणाची ही प्रक्रिया सुरु झालेली दिसते. महिला या विकासातील महत्वपूर्ण घटक असून ग्रामसभेत त्यांच्या निर्णय प्रक्रियेला महत्व आहे . अशा प्रकारे अनु. जाती जमाती व महिलांचे नेतृत्व ग्रामसभेतून निमार्ण होते

**७. ग्रामसभा ही राज्य व्यवस्थेची प्रशिक्षण देणारे व्यासपीठ :-**

ग्रामसभेच्या माध्यमातून लोकांचा सहभाग गावाच्या कार्यप्रणालीत होत असतो. तसेच निर्णय क्षमतेत त्यांचीभूमिका ही महत्वपूर्ण असते. या पध्दतीने गावातील लोकांना राजकीय प्रक्रियेचे प्रशिक्षण अनुभवातून ग्रामसभेच्या माध्यमातूनप्राप्त होते.

**८.ग्रामसभा सर्व गावाचे व्यासपीठ :-**

ग्रामसभा सर्व गावाचे व्यासपीठ असून संवादातून एकात्मता कायम ठेवण्याचे साधन आहे. ग्रामसभेमध्ये सर्व मतदार सारखे असतात व प्रत्येक व्यक्तीला बोलण्याचा व आपली मते मांडण्याचा अधिकार आहे. कमकुवत घटकाला गावच्या विकासाच्या मुळ प्रवाहामध्ये सामिल करून घेतल्यास खऱ्या अर्थाने गावाचा विकास साध्य करता येईल आणि या विकासाला एक विशिष्ट दिशा प्राप्त करून देते.

सारांश :

एकंदरीत ग्रामसभा गावातील सामुदायिक कर्तव्यांचे व आशा आकांक्षांचे प्रतिक आहे. कायद्याने जरी प्रत्यक्ष कामे मंजूर करण्याचा ग्रामसभेला अधिकार नसला तरी तिचा नैतिक अधिकार खूप मोठा असून तिच्या विरुद्ध ग्रामपंचायतीला जाता येणार नाही. असे असले तरी ग्रामसभा यशस्वी होण्यासाठी सर्वसाधारण ग्रामस्थ विशेषतः शेतमजूर व स्त्रिया यांना सोयीचा दिवस व वेळ ग्रामसभेसाठी निवडावी,ग्रामसभेची तारीख वेळ आणि ग्रामसभेपुढील विषय यांना व्यापक पूर्व प्रसिद्धी दयावी, दवंडीद्वारे, लाउडस्पीकरवरून, ग्रामपंचायत कार्यालय व गावातील मोक्याच्या जागी मोठे ठळक फलक लाऊन प्रसिद्धी करता यावी, वर्गात ग्रामसभेची माहिती सांगून मुलांना आपल्या पालकांना सभेस पाठविण्यास प्रवृत्त करावे, ग्रामसभेपूर्वी गावातील स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी सेविकेमार्फत महिलामंडळाला ग्रामसभेची माहिती देण्यात आली तर महिलांचा सहभाग ग्रामसभेत वाढेल, ग्रुप – ग्रामपंचायत असल्यास प्रत्येक गावात आळीपाळीने ग्रामसभा घेतली जावी,एरवी गावातील वेगवेगळया वस्त्या किंवा वाड्यांवर/पाड्यांवर आळीपाळीने ग्रामसभा घेण्यात यावी अशा पद्धतीने ग्रामसभा यशस्वी केल्या जाव्यात.

संदर्भसूची :

१.नितीन आरोटे व विजय भागात, "ग्रामसभा : प्रभावशाली शासन प्रशासन, घाट प्रकाशन,२०१७

२. ७३ व्या घटना दुरुस्ती मुळे ग्रामपंचायतीच्या कारभारातील बदल– पुस्तिका, वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट,

३.विभूते भालबा,ग्रामपंचायत प्रशासन-तोडओळख, प्रौढ आणि निरतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग कोल्हापूर,२००६

४. ठोबरे सतीश " भारतातील स्थानिक स्वशासन" कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१०.

५. पाटील वा.भा,'पंचायत राज' प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव २००९.